५५/८

# महाराष्ट्र शासन
# प्रवेश नियामक प्राधिकरण


९वा मजला, न्यु. एक्सेलसियर बिल्डींग,
ए.के. नायक मार्ग, फोर्ट,
मुंबई - ४०० ००१.

दुरध्वनी : ०२२ - २२०७ ३७१९ / २८
वेबसाईट : http://www.maha-ara.org
ईमेल : ara@maha-ara.org


क्रमांक : बैठक-१८२४/प्र.क्र. ३४६/प्रनिप्रा/५ सप्टेंबर/२०२४/ ६०७० दिनांक : 10 SEP 2024

**बैठकीचे इतिवृत्त**

उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन अधिसूचना क्रमांक संकीर्ण२०१५/प्र.क्र.७२(भाग-२)/तांशि-४, दिनांक २२/०८/२०१९ अन्वये श्री. जे. पी. डांगे, माजी मुख्य सचिव, यांची प्रवेश नियामक प्राधिकरणाचे अध्यक्ष म्हणुन ०५ वर्षाकरिता नियुक्ती करण्यात आली होती. त्यांच्या नियुक्तीचा कार्यकाल दिनांक २१/०८/२०२४ रोजी संपुष्टात आला.

या अनुषंगाने उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी दिनांक २१/०८/२०२४ रोजीच्या पत्रान्वये प्रवेश नियामक प्राधिकरण आणि शुल्क नियामक प्राधिकरण यांचे अध्यक्ष व सदस्य (नियुक्ती व सेवाशर्ती) नियम, २०२२ मधील नियम ६(२) मधील तरतूदींनुसार अध्यक्ष, प्रवेश नियमाक प्राधिकरण, मुंबई या पदाचा अतिरिक्त कार्यभार दिनांक २२/०८/२०२४ पासून पुढील आदेश होईपर्यंत मा. न्या. वि.एल. अचलिया (से.नि.), अध्यक्ष, शुल्क नियामक प्राधिकरण यांच्याकडे सोपविण्यात आलेला आहे.

तद्नुषंगाने **मा. न्या. वि.एल. अचलिया (से.नि.), अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण** यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवार, **<u>दिनांक ५ सप्टेंबर, २०२४ रोजी सांय. ०४:०० वा.</u>** झालेल्या प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या बैठकीचे इतिवृत्त खालील प्रमाणे,-

सदरील बैठकीस प्राधिकरणाचे सदस्य १) डॉ. राजेंद्र शिवाजी बंगाळ, कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक (दूरदृष्यप्रणालीद्वारे), २) श्री. रावसाहेब भागडे, (भा.प्र.से.), सदस्य सचिव तथा महासंचालक, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे (दूरदृष्यप्रणालीद्वारे) व ३) श्री. दिलीप सरदेसाई (भा.प्र.से.), सदस्य सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य हे बैठकीस उपस्थित होते.

तसेच डॉ. शैलेंद्र देवळाणकर, संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, म.रा. यांच्या वतीने श्री. हरिविजय शिंदे, सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे हे उपस्थित होते.

तसेच प्राधिकरणाचे सदस्य. वि.म. मोहितकर, संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई हे अनुपस्थित होते.

अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण
मुंबई, महाराष्ट्र राज्य

प्राधिकरणाच्या निर्देशानुसार अधिष्ठाता, सर ज.जी. समूह रुग्णालय व ग्रँट वैद्यकीय महाविद्यालय, मुंबई यांच्या वतीने १) डॉ. गजानन शे. चव्हाण, उपअधिष्ठाता, सर जे.जे. रुग्णालय, मुंबई, २) डॉ. व्ही. पाटील, प्राध्यापक व विभाग प्रमुख, मनोरुग्ण विभाग, सर ज.जी. समूह रुग्णालय व ग्रँट वैद्यकीय महाविद्यालय, मुंबई व ३) डॉ. माधव भोडंवे, सहाय्यक प्राध्यापक, सर ज.जी. समूह रुग्णालय व ग्रँट वैद्यकीय महाविद्यालय, मुंबई हे विशेष निमंत्रित उपस्थित होते.

प्राधिकरणाच्या उक्त बैठकीचे इतिवृत्त पुढीलप्रमाणे आहे,-

**विषय क्रमांक १ : उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या दिनांक ३०/०८/२०२४ रोजीच्या पत्रास अनुसरुन वय-वर्षे १८ खालील ०३ विद्यार्थ्यांच्या तात्पुरत्या दिव्यांग प्रकरणी (>४०%) निर्णय घेण्याबाबत.**

विषयांकित प्रकरणी खालील दस्ताऐवजांचे अवलोकन करुन सांगोपांग चर्चा करण्यात आली,-

१) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे क्रमांक प्रवेश-२०२४/प्र.क्र.३०१/तांशि-४, दिनांक ३०/०८/२०२४ रोजीचे पत्र.
२) केंद्र सरकारच्या सामाजिक न्याय व अधिकारिता (दिव्यांगजन सशक्तिकरण विभाग), नवी दिल्ली येथील दिनांक १२/०३/२०२४ रोजीची अधिसूचना. (सदर अधिसूचनेद्वारे विशिष्ट अध्ययन अक्षमता (SPECIFIC LEARNING DISABILITIES) असलेल्या विद्यार्थ्यांना दिव्यांग प्रमाणपत्र (DISABILITY CERTIFICATE) देण्यासंबंधी विस्तृत दिशानिर्देष देण्यात आलेले आहेत.)
३) महाराष्ट्र् ईन्स्टिटयुट ऑफ मेंटल हेल्थ, पाषाण, पुणे यांनी कु. जान्हवी भोसले यांना दिनांक १२/०१/२०२४ चे देण्यात आलेले दिव्यांग प्रमाणपत्र.

प्रस्तूत प्रकरणी कु. ओम संतोष काटेवाल, कु. साई संतोष काटेवाल व कु. जान्हवी भोसले या तीन विद्यार्थ्यांच्या दिव्यांग संवर्गातील प्रवेश प्रकरणी शासनाच्या दिनांक ३०/०८/२०२४ रोजीच्या पत्रास अनुसरुन सदस्य सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण व आयुक्त तथा सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष यांनी सर्व संबंधितांना विषयांकित प्रकरणी सविस्तर माहिती अवगत केली.

कु. साई संतोष काटेवाल व कु. जान्हवी भोसले यांच्याकडे दिव्यांगाचे प्रमाणपत्र हे तात्पुरते स्वरुपाचे असल्या कारणाने व प्रवेश नियमावली मध्ये असलेल्या तरतूदींचे अवलोकन केले असता त्यांनी सादर केलेल्या दिव्यांगत्व प्रमाणपत्रामध्ये Temporary Disability असा उल्लेख असल्याने ते प्रवेशास पात्र ठरत नसल्याचा निर्णय प्राधिकरणाच्या दिनांक ३०/०४/२०२४ रोजीच्या बैठकीतील विषय बाब क्रमांक ५ अन्वये घेण्यात आला.

भारत सरकारच्या सामाजिक न्याय व अधिकारिता (दिव्यांगजन सशक्तिकरण विभाग), नवी दिल्ली यांनी दिनांक १२/०३/२०२४ रोजीच्या निर्गमित केलेल्या विस्तृत मार्गदर्शन सुचनेनुसार संबंधीत व्यक्ती/विद्यार्थी यांनी त्यांचे तपासणी करुन दिव्यांग प्रमाणपत्र निर्गमित करण्याचे नमूद केलेले आहे. सदरच्या अधिसुचनेनुसार व्यक्ती/विद्यार्थ्याचे वय ५ वर्षे नंतर, १० वर्षे नंतर आणि १८ वर्षे पुर्ण झाल्यानंतर तपासणी करुन दिव्यांग प्रमाणपत्र निर्गमित करण्यासंबंधी विस्तृत मार्गदर्शक सुचना देण्यात आलेल्या आहेत. सदरच्या अधिसुचनेनुसार दिव्यांगत्व धारण केलेल्या व्यक्ती/विद्यार्थी यांनी १८ वर्षे व त्यापेक्षा जास्त वय

अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण
मुंबई, महाराष्ट्र राज्य

झाल्यानंतर कायमचे दिव्यांग प्रमाणपत्र (LIFELONG DISABILITY CERTIFICATE) देण्याचे नमूद केले आहे.

या अनुषंगाने कु. ओम संतोष काटेवाल, कु. साई संतोष काटेवाल व कु. जान्हवी भोसले यांचे शारीरिकदृष्टया विकलांग विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊन नये, याकरिता उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी दिनांक ३०/०८/२०२४ रोजीच्या पत्रान्वये प्रस्तूत प्रकरणी केंद्र शासनाच्या सामाजिक न्याय व अधिकारिता (दिव्यांगजन सशक्तिकरण विभाग), नवी दिल्ली यांनी निर्गमित केलेली अधिसूचना विचारात घेऊन या संदर्भात उचित निर्णय प्राधिकरण स्तरावर घेण्याबाबत प्राधिकरणास विनंती केली आहे.

शासनाची विनंती विचारात घेता या प्रकरणी तातडीने बैठक आयोजित करण्यात आली व सदरील बैठकीस संबंधित ०३ विद्यार्थ्यांना आणि तसेच सर ज.जी. समूह रुग्णालय व ग्रँट वैद्यकीय महाविद्यालय, मुंबई येथे तज्ञ डॉक्टरांना विशेष आमंत्रित म्हणुन बैठकीस उपस्थित राहण्याबाबत निर्देश देण्यात आले.

प्राधिकरणाच्या दिनांक ४/०९/२०२४ रोजीच्या पत्रास अनुसरुन कु. जान्हवी भोसले यांच्या वतीने त्यांचे पालक श्री. प्रताप भोसले हे बैठकीस उपस्थित होते. तसेच उर्वरित उमेदवार कु. ओम संतोष काटेवाल व कु. साई संतोष काटेवाल हे अनुपस्थित होते.

बैठकीस उपस्थित असलेले विशेष आमंत्रित वैद्यकीय तज्ञ १) डॉ. गजानन शे. चव्हाण, उपअधिष्ठाता, सर जे.जे. रुग्णालय, मुंबई, २) डॉ. व्ही. पाटील, प्राध्यापक व विभाग प्रमुख, मनोरुग्ण विभाग, सर ज.जी. समूह रुग्णालय व ग्रँट वैद्यकीय महाविद्यालय, मुंबई व ३) डॉ. माधव भोडंवे, सहाय्यक प्राध्यापक, सर ज.जी. समूह रुग्णालय व ग्रँट वैद्यकीय महाविद्यालय, मुंबई यांनी उमेदवाराचे पालक श्री. भोसले यांना कु. जान्हवी यांच्या अपंगत्वाबाबत विस्तृत विचारपूस केली.

कु. जान्हवी प्रताप भोसले यांचे वडिल श्री. प्रताप भोसले यांनी कु. जान्हवी यांचे दिव्यांगत्व हे जन्मापासून (जन्म दिनांक ७/१०/२००६) असल्याचे नमूद केले तसेच या अनुषंगाने नियमानुसार प्राप्त होणारे लाभ शालेय व महाविद्यालय शिक्षणा दरम्यान घेण्यात आल्याचे सांगितले. पुढील महिन्याच्या दिनांक ७/१०/२०२४ रोजी कु. जान्हवी यांचे वय-वर्षे १८ पूर्ण होणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

कु. जान्हवी भोसले यांचे वडील श्री. प्रताप भोसले यांनी असे नमूद केले आहे की, त्यांच्या मुलीला विशिष्ट अध्ययन अक्षमता (SPECIFIC LEARNING DISABILITIES) अंतर्गत कायमस्वरुपी दिव्यांगत्व आहे. कु. जान्हवी हिने १२ वी ची परिक्षा पास केल्यांनतर दिव्यांग व्यक्ती/विद्यार्थी यांच्या साठी निर्धारित केलेल्या आरक्षित प्रवर्गातून अर्ज करावयाचा होता. त्याअनुषंगाने त्यांनी त्यांच्या मुलीची महाराष्ट्र इन्स्टियूट ऑफ मेंटल हेल्थ पाशाण, पुणे यांचेकडून तपासणी करुन सदर प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला. संबंधीत संस्थेने त्यांच्या मुलीची तपासणी करुन तदनांक १२/०१/२०२४ रोजी त्यांचे मुलीचे दिव्यांगत्व ४० टक्के पेक्षा जास्त असल्याचे तात्पुरते दिव्यांगत्व प्रमाणपत्र TEMPORARY DISABILITY CERTIFICATE देण्यात आले. तपासणीच्या वेळी कु. जान्हवीचे वय १८ वर्षांपेक्षा कमी असल्याकारणाने देण्यात आलेल्या प्रमाणपत्रात तात्पुरते दिव्यांगत्व असे नमूद करण्यात आले आहे. उपरोक्त उल्लेखित अधिसुचनेनुसार त्यांच्या मुलीला १८ वर्षे पुर्ण केलयानंतर पुन:श्च तपासणी करुन कायमस्वरुपी दिव्यांगत्व प्रमाणपत्र (PERMENANT DISABILITY CERTIFICATE) सादर करणे शक्य असल्याचे सांगितले. कु. जान्हवी हिचे वय दि.७/१०/२०२४ रोजी १८ वर्षे पुर्ण होत असून सदरच्या संस्थेमध्ये उपस्थित राहुन तपासणीअंती कायमस्वरुपी दिव्यांगत्व प्रमाणपत्र सादर करण्याची परवानगी देण्यात यावी अशी विनंती करण्यात आली.

अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण
मुंबई, महाराष्ट्र राज्य

प्रवेश प्रक्रिया सुरु असल्याकारणाने दिनांक १२/०१/२०२४ रोजीचे प्रमाणपत्र तात्पुरत्या स्वरुपात (PROVISIONAL) मान्य करुन दिव्यांगत्व प्रवर्गातून पात्र समजण्यात यावे असे नमूद केले.

उपस्थित विशेष आमंत्रित वैद्यकीय अधिकारी वर्ग यांनी शारीरिकदृष्टया दिव्यांग प्रकरणी विहित नियमावली व मार्गदशक सूचनांची विस्तृत माहिती विशद केली, तसेच या संदर्भात केंद्र सरकारच्या सामाजिक न्याय व अधिकारिता (दिव्यांगजन सशक्तिकरण विभाग), नवी दिल्ली येथील दिनांक १२/०३/२०२४ रोजीच्या अधिसूचना व DISABILITY ACT - २०१६ च्या कलम ५६ अंतर्गत दिव्यांग ठरविण्यासाठी निर्गमित केलेल्या निर्देशांचे परिपत्रक सादर केले.

केंद्र सरकारच्या सामाजिक न्याय व अधिकारिता (दिव्यांगजन सशक्तिकरण विभाग), नवी दिल्ली येथील दिनांक १२/०३/२०२४ रोजीची अधिसूचनेतील नियम क्रमांक २१.८ मधील नमूद खालील तरतूदींचे अवलोकन करुन चर्चा करण्यात आली,-

**"21.8 Validity of Certificate:**
**Temporary certificate for children less than 5 years :**
Below the age of five years, a temporary certificate will be issued with a diagnosis of Global Development Delay. This certificate will be valid till the age of 05 years.
**For Children more than 5 years:**
The certificate issued at ≥5 years of age will have the following validity
(a) Children with 80% or more disability: After intitial certification after the age of 05 years, re-assessment and re-certifiation will be done at an age of 18 years. The certificate issued at 18 years or more of age will be valid lifelong.
(b) Children with disability <80%: The certificate will mention a renewal age. The certificatge issued after the age of 5 years will have to be renewed at the age of 10 years and 18 years. The certificate issued at 18 years or more of age will be valid lifelong.
Figure 1. Details of assessment and disability calculation for a child with global development delay / intellectual disability.
**22.5 Validity of Certificate:**
The certificagion will be done for children aged eight years and above only. The child will have to undergo repeat certification during the academic year of Class X and academic year of Class XII, if required. The certificate issued at 18 years or more will be valid life-long."

या अनुषंगाने उपस्थित वैद्यकीय तज्ञ अधिकारी यांनी असे सांगितले की, कु. जान्हवी भोसले यांचे वय तपासणी दरम्यान १८ वर्षापेक्षा कमी असल्याने त्यांना देण्यात आलेल्या प्रमाणपत्रामध्ये TEMPORARY DISABILITY असा उल्लेख करण्यात आला असावा. तसेच कु. जान्हवी यांनी १८ वर्षे पूर्ण केल्यानंतर वैद्यकीय तपासणीकरिता पुन्हा हजर राहुन उपरोक्त नमूद मार्गदर्शक सुचनेनुसार त्यांच्या दिव्यांगत्वासंबंधी तपासणी करुन सक्षम अधिकारी यांचेकडून त्यांचे दिव्यांगत्वाबद्दल नव्याने प्रमाणपत्र सादर करणे योग्य होईल असे मत व्यक्त केले.

सदस्य सचिव यांनी नमूद केले की, अन्य ०२ विद्यार्थी अनुक्रमे १) कु. साई संतोष काटेवाल व २) कु. ओम संतोष काटेवाल यांनी केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या अर्जामध्ये शारीरिकदृष्टया अपंगत्वासाठी असलेल्या आरक्षण प्रवर्गातून प्रवेश अर्ज केला नसल्याचे नमूद केले व या कारणास्तव त्यांचे प्रकरणी पुनर्विचार करण्याची आवश्यकता नाही.

अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण
मुंबई, महाराष्ट्र राज्य

उपरोक्त विषयावर विस्तृत चर्चा होऊन व तज्ञ वैद्यकीय अधिकारी यांचे मत विचारात घेऊन असे निदर्शनास आले आहे की, केंद्र सरकारने निर्गमित केलेल्या दिनांक १२/०३/२०२४ च्या अधिसुचनेतील तरतुदींप्रमाणे विद्यार्थ्यांचे वैद्यकीय तपासणी वेळेस कु. जान्हवी हिचे १८ वर्षे पुर्ण न झाल्यामुळे त्यांना तात्पुरते दिव्यांगत्व प्रमाणपत्र (TEMPORARY DISABILITY CERTIFICATE) सक्षम प्राधिकारी यांचेकडून देण्यात आले असावे. दिव्यांगत्व धारण केलेल्या विद्यार्थ्याने १८ वर्षे पुर्ण केल्यानंतर सक्षम प्राधिकरणाकडे उपस्थित राहुन संबंधीत विद्यार्थ्याची पुन:श्च तपासणी करुन कायमस्वरुपी दिव्यांगत्व प्रमाणपत्र (LIFELONG DISABILITY CERTIFICATE) देण्याचे सदर अधिसुचनेमध्ये स्पष्ट उल्लेख करण्यात आलेला आहे. या कारणामुळे कु. जान्हवी भोसले यांनी प्रवेश अर्ज करताना त्यांचे कायमस्वरुपी दिव्यांगत्व प्रमाणपत्र (LIFELONG DISABILITY CERTIFICATE) सादर न केल्यामुळे दिव्यांगत्वासाठी आरक्षित असलेल्या प्रवर्गातून प्रवेशासाठी संधी नाकारणे अन्यायकारक होईल. कु. जान्हवी भोसले यांचे वय दिनांक ७/१०/२०२४ रोजी १८ वर्षे पुण होत असल्याकारणाने त्यांनी सादर केलेल्या तात्पुरते प्रमाणपत्र (PROVISIONAL CERTIFICATE) म्हणुन स्विकारुन त्यांना दिव्यांगत्वासाठी आरक्षित प्रवर्गातून प्रवेश घेण्यासाठी प्रवेश प्रक्रियेत सहभागी होण्यास काही अटी व शर्तींच्या अधीन राहुन परवानगी देण्यात यावी असे ठरले.

कु. जान्हवी यांच्याकडे सद्यस्थितीमध्ये उपलब्ध असलेल्या दिनांक १२/०१/२०२४ च्या प्रमाणपत्राच्या आधारे शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेतून प्रवेशाकरिता शारीरिकदृष्टया विकलांग प्रवर्गातून खालील अटी व शर्तींच्या अधीन राहुन केंद्रिभुत प्रवेश प्रक्रियेमध्ये सहभागी होण्यास परवानगी देण्यात यावी.

१) कु. जान्हवी भोसले यांचे पालकांनी संबंधित प्राधिकाऱ्याचे शारीरिकदृष्टया अपंगत्वाचे प्रमाणपत्र १८ वर्षे पूर्ण झाल्यापासून दोन महिन्यांच्या आत संबंधीत महाविद्यालयास तसेच प्राधिकरणास सादर करणे बंधनकारक राहील. सदरील विहित कालावधीमध्ये कु. जान्हवी दिव्यांग प्रमाणपत्र सादर करण्यास असमर्थ ठरल्यास त्यांचा प्रवेश दिव्यांगांसाठी आरक्षित प्रवर्गातून प्रवेश रद्द समजण्यात येईल, याबाबींचा उल्लेख करुन स्वयंस्पष्ट हमीपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

२) १८ वर्ष पूर्ण झाल्यानंतर कु. जान्हवी स्वत: पालकांसह अधिष्ठाता, बहिरामजी जीजीभाई शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व ससून सर्वोपचार रुग्णालय, पुणे येथील शारीरिकदृष्टया विकलांग मंडळाकडे दिनांक १४/१०/२०२४ रोजी ठिक सकाळी ११:०० वा. हजर राहून त्यांच्या दिव्यांगत्वासंबंधी तपासणी करुन घ्यावी.

३) अधिष्ठाता, बहिरामजी जीजीभाई शासकीय वैद्यकीय महाविद्यालय (B.J. Medical College) व ससून सर्वोपचार रुग्णालय, पुणे यांना निर्देश देण्यात येत आहे की, कु. जान्हवी भोसले यांची वैद्यकीय तपासणी करुन केंद्र सरकारच्या सामाजिक न्याय व अधिकारिता (दिव्यांगजन सशक्तिकरण विभाग), नवी दिल्ली येथील दिनांक १२/०३/२०२४ रोजीची अधिसूचनेनुसार विस्तृत तपासणी संबंधित विषयातील तज्ञ डॉक्टरांकडून करुन घेण्यात यावी व तपासणी नंतर स्वयंस्पष्ट अहवाल प्रमाणपत्रांसह दोन आठवडयामध्ये प्राधिकरणास सादर करावा. तसेच मूळ प्रमाणपत्र कु. जान्हवी भोसले यांना अदा करण्यात यावे.

४) कु. जान्हवी यांनी सदार करण्यात आलेल्या प्रमाणपत्रानुसार त्यांचे दिव्यांगत्व कायमस्वरुपी (LIFELONG / PERMANENT DISABILITY) असल्याचे सिद्ध होत असल्यास त्यांच्या प्रवेशाच्या मान्यतेसंदर्भात पुढील आवश्यक कार्यवाही करण्यात यावी.

अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण
मुंबई, महाराष्ट्र राज्य

५) कु. जान्हवी भोसले या वैद्यकीय तपासणी मंडळाद्वारे LIFELONG / PERMANENT DISABILITY प्रमाणपत्र सदर कालावधीमध्ये सादर करण्यास असमर्थ ठरल्यास तात्काळ प्रभावाने त्यांचा प्रवेश रद्द समजण्यात यावा.

६) कु. जान्हवी भोसले यांचे पालक श्री. प्रताप भोसले यांनी दिलेल्या बैठकीमध्ये दिलेली हमी विचारात घेता त्यांची पाल्य कु. जान्हवी भोसले यांचे वय १८ पूर्ण झाल्यानंतर ०२ महिन्यामध्ये तपासणी करुन LIFELONG / PERMANENT DISABILITY असल्याचे प्रमाणपत्र सादर करण्यास कसूर केल्यास त्यांचा दिव्यांग आरक्षण प्रवर्गातंर्गत मिळालेला प्रवेश प्राधिकरणाद्वारे नामंजुर / रद्द समजण्यात येईल.

७) वरील अटी व शर्तीवर कु. जान्वही भोसले यांच्या शाररिकदृष्टया दिव्यांग प्रवर्गातील दावा तात्पुरत्या स्वरुपात ग्राह्य धरण्यात येत आहे. उपरोक्त निर्णय प्रवेश नियामक प्राधिकरणाकडे उपस्थित केलेला व अपवादात्मक परिस्थितीमध्ये घेण्यात आलेला असल्याने सदर निर्णय हा भविष्यात उदाहरण (CASE PRECEDENT) म्हणून ग्राहय धरण्यात येणार नाही.

८) कु. साई संतोष काटेवाल व कु. ओम संतोष काटेवाल यांनी केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या अर्जामध्ये शारीरिकदृष्टया अपंगत्वासाठी असलेल्या आरक्षण प्रवर्गातुन अर्ज केला नसल्याने प्रवेश नियामक प्राधिकरणाने त्यांचे संबंधी दिनांक ३०/०७/२०२४ च्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयाचे पुनर्विलोकन करण्याचे संयुक्तिक कारण नसल्याचे ठरविण्यात आले.

प्रस्तूत प्रकरणी असे निदर्शनास आले आहे की, दिव्यांगत्व धारण केलेल्या विद्यार्थी यांनी वयाची १८ वर्षे पुर्ण केल्याशिवाय कायमस्वरुपी दिव्यांग प्रमाणपत्र प्रवेश अर्ज सादर करण्यास असमर्थ ठरतात. त्यामुळे विद्यार्थी दिव्यांगत्वासाठी आरक्षित असलेल्या प्रवर्गातील प्रवेशासाठी वंचित राहु शकतात. ही बाब लक्षात घेता प्रवेश प्रक्रियेच्या नियमावली पुस्तिकेमध्ये याबाबत योग्य ती तरतूद करण्याबाबत शासनास सुचना करण्यात यावी.

<u>विषय क्रमांक ३:</u> <u>मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण, म.रा. यांच्या परवानगीने आयत्यावेळच्या विषयांवर चर्चा करणे व निर्णय घेणे.</u>

निरंक

वरीलप्रमाणे विषयनिहाय सांगोपांग चर्चा झाली, बैठकीच्या सरतेशेवटी सदस्य सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष, मुंबई यांनी उपस्थितांचे आभार मानून सदर बैठक संपन्न झाल्याचे जाहीर केले.

न्या. वि.एल. अचलिया (से.नि.)
अध्यक्ष,
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य.

अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण
मुंबई, महाराष्ट्र राज्य

दिनांक : 10 SEP 2024